# मंदिर प्रवेशाची भाषणे
# व इतर

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**मंदिर प्रवेशाची भाषणे व इतर : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २५०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मंदिर प्रवेशाची भाषणे | ............ | ५ |
| २. | चंद्रभागेच्या वाळवंटी | ............ | ४७ |
| ३. | कल्की अर्थात संस्कृतीचे भवितव्य | ............ | ८९ |
| ४. | गीताहृदय | ............ | १६९ |

✦✦✦

# मंदिर प्रवेशाची भाषणे

## १. बंधुभगिनींनो,

आज तुमच्यासमोर मी का बरे उभा आहे? कोणत्या गोष्टी सांगायला का आलो आहे? थोरामोठ्यांचा कोणता संदेश द्यायला मी आलो आहे? मी काँग्रेसचा सेवक आहे. काँग्रेसच्या झेंड्याखाली स्वराज्यासाठी धडपडत असताना मरण यावे हीच एक इच्छा असणारा मी एक प्राणी आहे. आपण सारे स्वराज्यासाठी अधीर आहोत. हा देश स्वतंत्र व्हावा असे तुमच्यातील प्रत्येकाला वाटत आहे. हा देश दास्यातच खितपत पडावा असे म्हणणारा कोणीतरी करंटा असेल का? परंतु जे स्वराज्य आपण इच्छितो, ज्याच्यासाठी हजारो मेले, उद्या लाख मरतील त्या स्वराज्याचा अर्थ काय?

## २. स्वराज्याचा अर्थ

स्वराज्यासाठी मरा, स्वातंत्र्यासाठी लढाई करायला निघा, असे मोघम म्हणून भागत नाही. तो काळ गेला. १९३० साली मी प्रथम जेव्हा सत्याग्रहाच्या चळवळीत सामील झालो तेव्हा उठा देशासाठी, उठा भारतमातेसाठी अशी राणा भीमदेव भाषणे करीत असे. क्षणभर लोकांच्या भावना उचंबळत. १९२४ मध्ये देशबंधू दास म्हणाले, ''स्वराज्य म्हणजे स्वराज्य. त्याची व्याख्या काय करायची?'' परंतु आज असे म्हणून चालणार नाही. हे स्वराज्य तुम्ही आणणार त्यात आमची स्थिती काय राहील हे प्रत्येकजण आज विचारील. तो विचारीत नसेल तर त्याने विचारले पाहिजे; तो विचारील असे केले पाहिजे.

# ३. शेतकऱ्यांचे स्वराज्य

खेड्यापाड्यांतून हिंडताना मी शेतकऱ्यांस सांगतो की, स्वराज्य तुमच्यासाठीच आणायचे आहे. शेतीची जमीन वाटून द्यायची आहे. ज्याप्रामाणे गोरे बकासुर नकोत. त्याप्रमाणे आपल्यातीलही नकोत. दिल्लीचा व्हाइसरॉय एका दिवसात सातशे रुपये घेतो. म्हणजे पाच हजारांचे अन्न एका दिवसात फन्ना करतो. म्हणून आपण त्याला बकासुर म्हणतो. परंतु आपल्यातही बकासुर आहेत. पाचशे एकर, हजार एकर जमीन उद्या एकेका जवळ राहाणार नाही. हिंदुस्थानातील सारी जमीन वाटली तर सव्वा ते दीड एकर एकेकाच्या वाटणीस येईल. स्वराज्यात २० की २५ एकर म्हणजे डोक्यावरून पाणी गेले अशी कोठेतरी मर्यादा घालू. बाकीची जमीन वाटून देऊ. तुम्हाला जमीन वाटून हवी असेल तर वाटून घ्या. परंतु असे करून प्रश्न सुटणार नाहीत. तुमच्या मुलांत उद्या का ती पुन्हा वाटायची? जमीन विकणे, विकत घेणे म्हणजे पापच. जमीन सर्वांच्या मालकीची. गावची जमीन गावच्या मालकीची. गावातील सर्व खपणाऱ्यांच्या मालकीची. ज्याला ज्याला श्रम करायचे असतील, त्याने त्या शेतावर करावे. तुम्ही काय ते ठरवा. स्वराज्यात वाटून हवी असतील तर वाटून मिळेल. गावच्या मालकीची हवी असेल तर तसे करू. संपूर्ण स्वराज्य आले म्हणजे या गोष्टी करायच्या आहेत. तोपर्यंत हा नवा कुळकायदा आहे. कुळाला दोन हिस्से उत्पन्न राहावे, धन्याला एक हिस्सा. काँग्रेस अशा रीतीने तुम्हा श्रमणाऱ्यांकडे येत आहे. शेतकऱ्यांचे स्वराज्य आणीत आहे.

# ४. कारखाने राष्ट्राच्या मालकीचे

ज्याप्रमाणे शेतकऱ्याला जमीन मिळेल त्याप्रमाणे कामगारही कारखान्यात सुखी होईल. मोठे कारखाने राष्ट्राच्या मालकीचे होतील. कामगारांना पगारी रजा मिळेल. विमा उतरला जाईल. राहायला सुरेख चाळी, भरपूर पगार, कामाची शाश्वती, पुरेशी विश्रांती. मुलाबाळांच्या शिक्षणाची संधी. आजारीपणात दवा, असे कामगारांचे जीवन होईल, रक्तशोषण थांबेल.

शेतकरी आणि कामगार यांचे हे असे स्वराज्य आणायचे आहे. हे चित्र डोळ्यापुढे येऊन त्यांना आनंद होईल. अद्याप असे स्वराज्य आले नाही. अजून संपूर्ण सत्ता हाती नाही. कलेक्टरचा पगार ठरविण्याचाही अधिकार अद्याप आपणास



मिळालेला नाही. दिल्लीला वाटाघाटी होत आहेत. स्वराज्याचा नकाशा तयार होत आहे. घटना बनविली जात आहे. परंतु ही घटना तयार करण्यात सर्वांनी सहकार्य केले तर? सर्वांचे सहकार्य नाही म्हणून ही घटना आम्ही मानीत नाही, असे ब्रिटिश सरकार म्हणाले तर?

# ५. चलेजावची गर्जना

तर आम्हास पुन्हा आगीतून जावे लागेल. ''तुम्ही येथे आहात म्हणून आमचे जुळत नाही. तुम्ही चालते व्हा.'' अशीच पुन्हा घोषणा काँग्रेसला करावी लागेल. ते ते प्रांत बंड करून उठतील. ज्यांना ज्यांना ब्रिटिश सत्तेचा वीट आला असेल ते ते प्रांत आपापले स्वातंत्र्य जाहीर करतील. इंग्रजांच्या बाजूचे कोण ते दिसून येईल. शेवटचा लढा करू, तुम्ही तयार राहा. एकेका तालुक्यात अठरा वर्षांवरचे हजार तरी तरुण मरणाची शपथ घेतलेले संघटित असोत. उद्या मुंबई इलाख्याने स्वातंत्र्य पुकारले आणि या प्रांतातील पोलीसखाते स्वतंत्र मुंबई इलाख्यातल्याप्रमाणे वागायला तयार नसेल तर काँग्रेस म्हणेल ताबडतोब पन्नास हजार तरुण हवे आहेत, आपण मागणी पुरी केली पाहिजे. आयत्या वेळेस आकाशातून संघटना पडणार नाही. तयार राहा. गावोगाव सेवादले, तरुण संघटना बांधून ठेवा. काँग्रेसची हाक येईपर्यंत दारूबंदी, स्वच्छता, साक्षरता, अस्पृश्यनिवारण, हिंदुमुस्लीम ऐक्य इत्यादीत शक्ती वेचा.

# ६. अस्पृश्यांची काय स्थिती राहील?

बंधूनो, स्वराज्यात ज्याप्रमाणे शेतकरी, कामकरी सुखी व्हावेत असे आपण म्हणतो, त्याचप्रमाणे अस्पृश्यही सुखी व्हायला हवेत. त्यांना इतरांप्रमाणे जमीन मिळेल. कारखान्यात स्वाभिमानपूर्वक काम करता येईल. परंतु त्यांना शेतीवाडी मिळाली, काम मिळाले एवढ्याने सारे होईल असे नाही. अस्पृश्य बंधू विचारतात, ''स्वराज्यात आमची स्थिती कशी राहील ते सांगा.'' तुम्ही त्यांना काय सांगणार? १९४२ मध्ये चलेजावचा लढा सुरू झाला होता. त्याचवेळेस मुंबईस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एक भाषण झाले होते. त्या भाषणात ते म्हणाले, ''काँग्रेसचे पुढारी ब्रिटिशांना युद्धहेतू विचारीत असतात. मीही चलेजावच्या काँग्रेसच्या लढाईचे युद्धहेतू विचारीत आहे. जे स्वराज्य तुम्ही आणणार त्यात पाचसहा कोटी दलित जनता

अशीच माणुसकीस पारखी राहाणार ना? कोणाचे स्वराज्य तुम्ही आणू पाहता?'' असे त्यांनी विचारले होते. ब्रिटिशांनी हिंदुस्थानला युद्धाच्या खाईत ओढले. काँग्रेसने सांगितले, ''हे युद्ध लोकशाहीसाठी असेल तर या देशाला लोकशाही का देत नाही? हे युद्ध स्वातंत्र्यासाठी असेल तर आम्हाला स्वातंत्र्य का देत नाही?'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर काँग्रेसला तोच प्रश्न विचारतात.

## ७. कोणते उत्तर देणार?

इंग्रजांकडून स्वराज्य घेऊ तेव्हा घेऊ. संपूर्ण सत्ता हाती आल्यावर सर्वांना जमीन वाटून देऊ तेव्हा देऊ. परंतु जे स्वराज्य आपल्या कोट्यवधी बंधूंना आपण या क्षणी देऊ शकतो, ते आपण का देत नाही. स्वातंत्र्य दोन प्रकारचे आहे. आर्थिक नि सामाजिक. आर्थिक स्वातंत्र्य सोळा आणे सत्ता हाती आल्यावर आपण निर्मू शकू. परंतु सामाजिक स्वातंत्र्य या घटकेला आपण सर्वांना देऊ शकतो. ते देण्याच्या आड काही ब्रिटिश येत नाहीत. तुमच्या विहिरींवर हरिजनांनी पाणी भरले तर गोरा कलेक्टर किंवा गोरा गव्हर्नर का आड येत आहे? हे सामाजिक स्वातंत्र्य आपणच अडवून ठेवले आहे. मनाचा मोठेपणा असता तर एका क्षणात ते आपण दिले असते.

## ८. अनेकांचे प्रयत्न

गेल्या शतकात ही अस्पृश्यता जावी म्हणून अनेकांनी प्रयत्न केले. महात्मा जोतिबा फुले यांनी प्रथम पुण्यात आपल्या हौदावर हरिजनांना पाणी भरू दिले. त्यांनी त्यांच्यासाठी शाळा काढल्या. त्यांनी निंदा, अपमान, बहिष्कार सारे सहन केले.

**''तरीच संत व्हावे, जग-बोलणे सोसावे.''**

हे मुक्ताबाईचे थोर चरण त्यांना माहीत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी छात्रालये काढून खूप खटपट केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अनेक हरिजनांना उच्च शिक्षण दिले; विलायतेत पाठविले. प्रध्यापक माटे यांनी धडपड केली. हिंदुस्थानभर आर्य समाजाचे प्रयत्नही चालू होते, चालू आहेत. परंतु अस्पृश्यता जाईना. लाखो खेड्यापाड्यांतून ती अजून तशीच आहे.



## ९. १९३२ मधील महात्माजींचा उपवास

आणि शेवटी १९३२ मध्ये महात्माजींनी उपवास केला. स्पृश्य हिंदू समाजापासून अस्पृश्य समाजास कायमचे पारखे करण्याचा इंग्रजी डाव होता. महात्माजींना वेदना झाल्या. ते म्हणाले, ''हिंदू धर्मावर हा कायमचा कलंक राहील. हिंदू धर्माने आपल्या अनुदारपणामुळे आपल्या कोट्यवधी बंधूंना एका क्षणात दूर केले असे इतिहास सदैव सांगत राहील. आम्ही अस्पृश्यता लवकर घालवू. तुम्ही अस्पृश्य बंधू कायमचे दूर करू नका. नाहीतर मी उपवास करीन.'' ब्रिटिश ऐकेनात. महात्माजींचे अग्निदिव्य सुरू झाले. शेवटी पुणे करार झाला.

## १०. दहा वर्षे

महात्माजींनी करारानंतर पुन्हा २१ दिवस उपवास केला. ते म्हणाले, ''हरिजनांच्या सेवेसाठी लाखो रुपये लोक देतील. परंतु माझ्या उपवासाने मी आध्यात्मिक भांडवल देत आहे.'' तुमची, आमची सर्वांची हृदये या कामात रंगावी अशी महात्माजींची उत्कट इच्छा होती. १० वर्षांत ही अस्पृश्यता जाईल अशी त्यांना आशा होती. परंतु दहाची पंधरा वर्षे झाली. आपणास काय दिसत आहे? किती मंदिरे उघडली? किती विहिरी मोकळ्या झाल्या? हाटेल्स, खाणावळी यातून मोकळेपणाने त्यांना जाता येते का? भाड्याने राहावयाला घर मिळते का? कोणते उत्तर द्याल? आज बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''पुणे करार रद्द करा.'' तुम्हाला राग येतो. त्यांना चर्चिलला तर केली तार तुम्हाला घुस्सा येतो. परंतु प्रेम मिळावे म्हणून तुम्ही काय केले आहे?

## ११. महापुरुषाची मान खाली

१९३१ मध्ये वर्तुळाकार परिषदेच्या वेळेस महात्माजी म्हणाले, ''डॉक्टर आंबेडकरांना माझ्यावर थुंकण्याचा हक्क आहे. कारण हिंदूंची पापे माझ्याही शिरावर आहेत.'' आज पुन्हा त्यांना आपण असेच म्हणायला लागणार का? डॉ. आंबेडकर गांधीजींना जर म्हणाले, ''चला, लाखो खेड्यापाड्यांतून आणि दाखवा शिवाशिवी गेली का'' गांधीजी काय म्हणतील? त्यांना आशा होती की स्वातंत्र्योन्मुख हिंदी राष्ट्र अस्पृश्यता झपाट्याने दूर करील. परंतु आपण उदासीन राहिलो.

# १२. राष्ट्राचा पिता

महात्माजी म्हणाले, या राष्ट्राचे तात घटनासमितीच्या वेळेस बोलताना जवाहरलालजी म्हणाले, ''आज महात्माजी कोठे आहेत? कोठे आहे तो राष्ट्राचा पिता? दूर नौखालीत ते अनवाणी अविश्रांत काम करीत आहेत.'' बंधूनो, जवाहरलालजींनी गांधीजींना ''तात'' म्हणून संबोधिले आणि शून्यांतून विश्व निर्माण करणारे, तुम्ही रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो अशी दिव्य वाणी बोलणारे, चलो दिल्ली, जयहिंद हा नवमंत्र देणारे ते नेताजी सुभाषचंद्र काय म्हणाले आहे माहीत? आझाद हिंद सैन्याची निर्मिती करून नेताजी म्हणाले, ''महात्माजी, तुम्ही राष्ट्राचे तात आहात, आशीर्वाद पाठवा.'' अशा या राष्ट्रपित्याची मान तुमच्या आमच्या उदासीनतेमुळे खाली व्हावी असे तुम्हास वाटते का? कशाला आपण महात्मा गांधी की जय म्हणावे? आपण सारे कामचुकार ठरलो.

# १३. माझी बेचैनी

पूज्य विनोबाजींनी विचारले, ''हरिजनांसाठी काय केलेत हिशोब द्या.'' आम्ही कोणता हिशोब देणार? आणि आमचे ऐकणार तरी कोण? महात्माजींच्या उपवासाने आम्ही उठलो नाही. तेथे आम्ही लुंग्यासुंग्यांचे कोण ऐकणार? आपण उपवास करून मरावे असे मनात आले. इंग्रजीची गुलामगिरी जावी म्हणून आपण मरतो, मग आपल्याच भावांनी आपल्याच भावांवर लादलेली गुलामगिरी दूर करण्यासाठी का मरू नये? ३० वर्षांपूर्वी हुंड्याची चाल रद्द व्हावी म्हणून स्नेहलता नावाच्या एका बंगाली तरुणीने अंगावर रॉकेल ओतून बलिदान केले. एकेक दुष्ट रूढी नष्ट व्हावी म्हणून काहींनी मरावे असे मला वाटते. जुने गंजलेली कुलूप उघडत नसेल तर आत तेल घालतात. त्याप्रमाणे आपली गंजलेली हृदये उघडावी म्हणून काहींनी प्राणाचे तेल ओतले पाहिजे. काहींनी प्रचाराचा पाऊस पाडावा. काहींनी मरावे. आगाखान राजवाड्यात बंदीत असताना १९४२ च्या फेब्रुवारी महिन्यात महात्माजींचा उपवास सुरू होता. त्या उपवासातील त्यांचे शब्द तुम्हास माहीत आहेत? माझ्या कानांवर आले होते.



# १४. हारकिरी करा

महात्माजी म्हणाले, ''बाहेर लढा थांबवा. लोकांना काही करता येत नसेल तर त्यांनी मरावे. ब्रिटिश सत्तेचा वीट आला असेल तर व्हाइसरॉयच्या बंगगल्यासमोर जाऊन डोकी फोडून त्यांनी प्राण द्यावे. परंतु गुलाम होऊ नये. हाराकीरी भ्याडाची नसून शूराची असते हे जपान्यांनी जगास दाखविले आहे.'' असे ते तळमळीचे उद्‌गार होते. पूज्य विनोबाजींना हे उद्‌गार लिहून मी कळविले की अस्पृश्यतेची गुलामगिरी नष्ट करायला मला परवानगी द्या. आठ महिन्यांपूर्वी मी त्यांना विचारले, त्यांनी धीर धरायला सांगितले. कोठवर धीर धरायचा? कार्तिकी एकादशी जवळ येत होती. दिल्लीला हरिजन पुढारी जोगेन्द्र मंडल म्हणाले, ''आम्ही हिंदुधर्म सोडून जाऊ'' लीग पुढारी म्हणाले, ''सारे आमच्या धर्मात या.'' हिंदुधर्माची ही विटंबना मला सहन होईना. परंतु स्पृश्य हिंदूंच्या अनुदारपणामुळे ही विटंबना होत होती. आपण प्राण फेकावे असे मनात आले. इतक्यात खानदेशचे एक थोर कार्यकर्ते श्री. सीतारामभाऊ चौधरी हिमायलयाची पायी यात्रा करून पंढरपूरचे मंदिर उघडावे म्हणून तेथे खटपटीस गेले होते. त्यांनी मला लिहिले, ''तुम्ही आलात तर मला हिंमत चढेल. बळ चढेल. या.'' मी मनात म्हटले ''माझ्याजवळ कोणते बळ? मी का  बडवे मंडळीजवळ शास्त्रार्थ करीत बसू? देवाजवळ सारी लेकरे जाणे ही का चर्चेची वस्तू? आपले प्राण हातात घेऊन उभे राहावे एवढेच आपले बळ.'' आणि मी उपवास सुरू केला. परंतु महर्षी सेनापती, भाई अच्युतराव, शिरुभाऊ लिमये, एस्. एम. जोशी, मधु लिमये या सर्वांनी मला गळ घातली. सहा महिने थांबा असे सेनापती म्हणाले. त्या पुण्यमूर्तींचे नको ऐकू तर कोणाचे? शेवटी उपवास पुढे ढकलून मी आज हिंडत आहे. सेनापतींच्या कृपाछत्राखाली आम्ही हिंडत आहोत. अस्पृश्यता दूर करा म्हणून सांगत फिरत आहोत. मी हिंडणार नव्हतो. कोठे तरी राम नाम म्हणत बसणार होतो. परंतु शेवटी बाहेर पडलो. परिणाम होवो, न होवो. तू सांगत जा, असे मी मनात म्हटले.

# १५. पंढरपूरचा विठोबा

पंढरपूरचे मंदिर हरिजनांना मोकळे व्हावे म्हणून मी मरायला उभा राहिलो. पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राचे हृदय. महाराष्ट्राच्या जीवनाची ही किल्ली. पंढरपूरची कळ

दाबली तर महाराष्ट्रभर प्रकाश पडेल असे मनात आले. पंढरपूर म्हणजे दक्षिणेची काशी. येथील पांडुरंगाचे मंदिर अति प्राचीन. जवळजवळ अडीच हजार वर्षांचे. बडवे मंडळी तेथे येऊनच दोन हजार वर्षे झालीत. बडवे मंडळी कर्नाटकातून आली. पंढरीचे वारकरी तिकडेही आहेत. कानात मकरकुंडले घालण्याची दक्षिणेकडचीच पद्धती. आद्य शंकराचार्य पांडुरंगाच्या दर्शनार्थ आले होते. त्यांनी पांडुरंगाष्टक स्तोत्र केले आहे. ''देवा, कमरेवर हात ठेवून माझ्या भक्तांना संसारसागर कमरेइतकाच खोल आहे असे का तू दाखवीत आहेस.'' असे त्यांनी त्यात म्हटले आहे. पंढरपूर, बार्शी म्हणजे प्राचीन धर्मसंस्कृतीचा वसौटाधर्मसंस्कृतीचे माहेरघर. अंबरीष राजा बार्शीचाच. अंबरीषासाठी भगवान आला. पुंडलीकासाठी पंढरपूरचे परब्रह्म आले. असे प्राचीन पवित्र मंदिरच देवाच्या सर्व लेकरांना मोकळे व्हावे म्हणून मी उपवास सुरू केला होता.

## १६. संतांचे कार्य

वारकरी पंथ सुरू होण्यापूर्वी जवळजवळ हजार वर्षे हे मंदिर प्रसिद्ध होते. पुढे संतांनी आणखी महिमा वाढविला. नामदेव, ज्ञानदेव उत्तरेची यात्रा करून आले. इस्लामी धर्म येत होता. मलबार किनाऱ्यावर तो कधीपासून आलेला होता. इस्लामी धर्मांतील समतेचा परिणाम संतांच्या मनावर झाल्याशिवाय राहणार नाही. हिंदुधर्म उदार न होईल तर टिकणार नाही असे त्यांना वाटले असावे. मशिदीत सारे समान. हिंदुमंदिरात असे केव्हा होईल? असे विचार त्यांच्या डोक्यात आले असतील. तेव्हा पंढरपूरच्या वाळवंटात तरी भेदभाव, शिवाशिव नको असे त्यांनी ठरविले असावे. साऱ्या महाराष्ट्रातून विठ्ठलनामाचा गजर करीत येथे या. या वाळवंटात एकत्व अनुभवा. येथे परस्परांस भेटा, क्षेमालिंगने द्या. आणि नवीन प्रथा सुरू झाली, वाळवंट दणाणले, गजबजले. तुकारामांच्या अभंगात वाळवंटाचा अपार महिमा आहे.

**''एकमेकां लोटांगणी येती रे**
**कठोर हृदये मृदु नवनीते**
**पाषाणा पाझर फुटती रे''**

असे उचंबळून तुकोबा म्हतात.



## १७. बंडखोर संत

संत बंडखोर होते. संस्कृतातील ज्ञान त्यांनी मराठीत आणले. संत कारुण्यसागर होते. झोपडी झोपडीत त्यांना ज्ञान न्यायचे होते, खरा धर्म न्यायचा होता. त्यांचा छळ झाला. ज्ञानेश्वरादिकांवर बहिष्कार. कुंभाराचे मडकेही त्यांना मिळू दिले नाही. तुकोबांचे अभंग इंद्रायणीत फेकण्यात आले. एकनाथी भागवत काशीच्या पंडितांनी गंगेत फेकले. संत मेल्यावर त्यांच्या पालख्या आपण उचलतो. परंतु ते जिवंत असताना त्यांचे आपण छळच केले. परंतु ते डगमगले नाहीत. वाळवंटात तरी त्यांनी भेदभाव नष्ट केला.

## १८. पुढचे पाऊल

त्याच्या पुढचे पाऊल आपण नको का टाकायला? समाज पुढे जात असतो. नदी थबकली की संपली. समुद्राला मिळेपर्यंत ती पुढे जाणार. आपणही ''अवघाची संसार सुखाचा'' होईपर्यंत पुढे गेले पाहिजे. परंतु आपण पुढे गेलो नाही. पंढरपूरच्या वाळवंटात एकमेकांना भेटू. परंतु देवाजवळ अजूनही हरिजनांना जाता येत नाही. वारी करून घरी आल्यावर गावात शिवाशिव आहे ती आहेच. शेवटी पंढरपूर स्वत:जवळ आणायचे असते. एकनाथ म्हणतात:

**''काया हे पंढरी, आत्मा हा विठ्ठल.''**

शेवटी स्वत:च्या जीवनात सारे आणायचे असते. परंतु आपण संतांचा मागोवा घेत पुढे गेलो नाही. एखाद्या आईचे मूल पहिले पाऊल टाकते. ती शेजीला आनंदाने म्हणते, ''बाळ्याने आज पहिले पाऊल टाकले.'' परंतु चार महिने झाले तरी बाळ्या जर दुसरे पाऊल टाकीत नसेल तर मातेला का आनंद होईल? आपण सहाशे वर्षांत दुसरे पाऊल टाकले नाही. संतांनी वाळवंटांत सर्वांना जवळ घेतले. आपण मंदिरात सर्वांना घेऊ या. आपले हे वंशज असे कसे गतिहीन करंटे असे मनात येऊन संत तडफडत असतील, दु:खाने सुस्कारे सोडत असतील.

आपण का पूर्वजांच्यापेक्षा अधिक शहाणे असे कोणी विचारतात. आपण पुढच्या काळात असल्यामुळे आपणास पुढचे दिसते. बापाने लहान मुलाला खांद्यावर घेतले तर त्या लहान मुलाला बापापेक्षा अधिक दूरचे दिसेल. मुलगा जर बापाला म्हणेल, ''बाबा, ती तिकडून लॉरी येत आहे, दूर व्हा, मला दिसत आहे.'' तर बाप का

असे म्हणेल, ''गाढवा, मला शिकवतोस? मला दिसत नाही. तुला कशी दिसेल?'' आपण मागच्या पिढ्यांच्या खांद्यावर आहोत. आपण पुढचे पाहू शकतो. यात मागील पिढ्यांचा अनादर नाही. उलट पुढे न जाण्यात त्यांचा अनादर आहे. पायरीला नमस्कार करायला, परंतु तिच्यावर पाय ठेवून पुढे जायचे, उंच चढायचे. तेथेच घुटमळत नाही बसायचे. ती ती पिढी एकेक पायरी वर जात असावी. ध्येयमंदिराकडे जात असावी.

## १९. काळाप्रमाणे बदल करा, नाहीतर मरा

आपण काळाप्रमाणे बदल करायला हवा. आजूबाजूची हवा पाहून वागावे लागते. तसे न करू तर मरू. थंडीचे दिवस आले तर आपण गरम पांघरू, उन्हाळ्याचे दिवस आले तर पातळ कपडे पेहरू. थंडीत उघडे बसू तर गारठून मरू. उन्हाळ्यात घोंगड्या पांघरू तर घामाघूम होऊन गुदमरून मरू. थंडीच्या दिवसांत कडक चहाचा घोट घ्याल. उन्हाळ्याचे दिवसांत थंड सरबत घ्याल. हवा बघून खाण्यापिण्यात. कपड्यालत्त्यातही आपण बदल करतो. मग डोक्यात नको का बदल करायला? १९४७ सालात वावरायचे आणि डोके का त्रेतायुगातील ठेवायचे? आज जगात नवीन विचारांची वादळे आहेत. समाजवादी क्रांतीचे नगारे वाजत आहेत. इन्किलाबची गर्जना होत आहे. समतेचा घोष होत आहे. अशा वेळेस तुम्ही आम्ही का शिवू नकोची तुणतुणी वाजवीत बसायचे? जरा काळ वेळ पाहा. आज सारी दुनिया जवळ येत आहे. सारे जग जणू तिमजली घर झाले आहे. अमेरिकेत काय बोलले जाते, काय होते, ते मुंबईत लगेच वर्तमानपत्राच्या कचेरीत आपोआप यंत्राने लिहिले जाते. दोन दिवसांत जवाहरलाल लंडनला गेले नि दोन दिवसांत पुन्हा दिल्लीला आले. २।। दिवसांत अमेरिकेत आता जाता येईल. अशा काळात आपण आहोत. बंधूंनो, दूर राहायचे हे दिवस नाहीत. डबकी करून बसण्याचे हे दिवस नाहीत. मोठी दृष्टी घ्या. विचारांत, आचारांत उदार दृष्टी आणा.

## २०. यम नि नियम

धर्मांत दोन भाग असतात. यम नि नियम. यम म्हणजे कधी न बदलणारी शाश्वत सत्ये. खरे बोलावे, आत्मा अमर आहे, सर्वत्र आत्मतत्त्व पाहा– या तत्त्वांना यम



म्हणतात. ही तत्त्वे त्रिकालाबाधित असतात. प्रभू रामचंद्र, हरिश्चंद्र यांचा काळ असो. महात्माजींचा असो. त्याला सोडू नये हा निरपवाद सिद्धान्त आहे. यमात फरक कधी होत नाही. परंतु नियमात होत असतो. त्या त्या काळी समाजाला फरक करावे लागतात. चालीरीती बदलतात. लहानपणचे कपडे मोठेपणी अंगास येणार नाहीत. असे फरक आपण सदैव करीत होतो. म्हणून तर नाना स्मृती. श्रीशंकराचार्यांनी म्हटले आहे, ''अग्नी थंड आहे असे शेकडो श्रुती येऊन सांगू लागल्या म्हणून का प्रमाण मानायचे?'' पूर्वज फरक करणारे, बदल करणारे होते. स्वतंत्र बुद्धी वापरणारे होते.

## २१. बंडखोर श्रीकृष्ण

एकदा एक शास्त्री मला म्हणाले, ''गीतेत 'तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते' असे म्हटले आहे. शास्त्राने सांगितल्यामुळे आम्ही अस्पृश्यता मानतो. दुष्टपणामुळे नव्हे.'' परंतु मी त्यांना म्हटले ''भगवान् जे शास्त्रप्रमाण सांगत आहेत ते तुमचे शिवाशिवीचे शास्त्र नव्हे. ते म्हणतात 'मया प्रोक्तं शास्त्रम्' मी जे शास्त्र तुला सांगितले ते प्रमाण मान. ते तर सारे बुरसटलेले धर्म झुगारून द्यायला सांगत होते.''

**''सोडून सगळे धर्म एका शरण ये मज।।''**

(सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज) असे ते म्हणत आहेत. ते वेदवादांचे धर्म त्यांना नको होते. श्रेष्ठकनिष्ठपणाचे धर्म त्यांना नको होते. समाजाच्या सेवेचे कोणतेही कर्म करणारा मुक्त आहे अशी त्यांनी महान शिकवण आहे. ''स्वकर्मकुसुमी त्यास पुजूनि मोक्ष मेळवी'' सेवेचे कोणतेही कर्म म्हणजे प्रभूची पूजा. श्रीकृष्णाच्या काळी ब्राह्मण, क्षत्रियांना वरचे स्थान होते. स्त्रियांना कमी मानू लागले होते. श्रीकृष्ण म्हणतात.

**''स्त्रियो वेश्यास्तथाशूद्रस्तेऽपियान्ति परांगतिम्''**

ते सर्वांना मोक्षाची दारे उघडीत आहेत. स्त्रिया, शेतकरी, कामकरी सर्वांना ते जवळ घेत आहेत. सेवेची जी जी कर्मे आपण कमी मानू लागलो ती ती भगवंतांनी स्वत: केली. राजसूययज्ञाच्या वेळेस धर्मराजा श्रीकृष्णास म्हणाला, ''देवा, तू कोणते काम करशील? येणाऱ्या थोरामोठ्यांचे स्वागत करशील?'' श्रीकृष्ण म्हणाला, ''नको. मी एक काम करीन. हजारो लोक जेवून उठतील. तेथे मी शेण

लावीन.'' पुरुष जेवून ओटीवर विडा चघळीत बसतात. बायका शेण लावतात. म्हणून का त्या तुच्छ? तर मग तेच काम मी करतो... आणि ते कर्म पवित्र आहे, थोर आहे असे जगाला दाखवितो, असे श्रीकृष्ण मनात म्हणाले असतील. त्यांनी गायी चारल्या. गुराख्यांबरोबर ते जेवले, त्यांनी घोडे हाकले, त्यांचे खरारे केले. त्यांनी उष्टी काढून शेण लावले. महापुरुष सेवेची ती ती कर्मे पवित्र आहेत असे ती कर्मे स्वत: करून सिद्ध करतात. आपल्या महाराष्ट्राचे महर्षी सेनापती आहेत. त्यांचे दिव्य जीवन तुम्हाला माहीत आहे?

## २२. सेनापतींचे पवित्र जीवन

१९०२ मध्ये त्यांनी जीवन हे देशार्थ म्हणून प्रतिज्ञा केली. १९०८ मध्ये ते हेरंब आणि मिर्झा तिथे बाँबविद्या पसरू लागले. पुढे अज्ञातवासात ते गेले. १९१३ मध्ये साडे चार वर्षांच्या अज्ञातवासानंतर ते प्रकट झाले. नगर जिल्ह्यातील आपल्या पारनेर गावी गेले. आणि तेथे सकाळी सहापासून दुपारी बारा वाजेपर्यंत ते भंग्याचे काम करू लागले. त्यांचे वडील तेथील प्रसिद्ध गणपतीच्या मंदिरातील पिढीजात पुजारी; लोकांनी वडिलांकडे तक्रार केली, ''तुम्ही गणपतीचे पुजारी; तुमचा मुलगा काय करतो बघा.'' वडिलांनी सेनापतीस सारे सांगितले. सेनापतींनी उत्तर दिले, ''बाबा, तुम्ही गणपतीच्या मूर्तीची पूजा करताना त्याची चौकट साफ करता. मी माझ्या गणपतीची चौकट साफ करतो. माझा गणपती केवळ मंदिरात नाही. तो सर्वत्र पसरलेला आहे. गावातील जनता म्हणजे माझा गणपती. त्या गणपतीची बैठक मी स्वच्छ करतो.'' थोर उद्‌गार! बंधूंनो, प्रभू तर सर्वत्र आहे. त्याच्या सेवेचे प्रत्येक कर्म पवित्र आहे. मी एकदा मागे एका गावी गेलो होतो. गटारे साफ होत होती. रस्ते स्वच्छ केले जात होते. मी चौकशी केली. तेव्हा कळले की गव्हर्नर येणार म्हणून साफसफाई. गव्हर्नर येण्यापूर्वी का गावात माणसे नव्हती? एकनाथांच्या मुलाने काशीहून गंगेची कावड आणली. तो पैठणला थांबला, पुढे रामेश्वरास तो जाणार होता. ती कावड तो रामेश्वरावर ओतणार होता. परंतु वाळवंटात तडफडणाऱ्या गाढवाला एकनाथांनी ती गंगा पाजली. मुलगा संतापला. परंतु त्याच्या स्वप्नात रामेश्वर येऊन म्हणाला, ''ती कावड मला पोचली.'' देव का फक्त वर काशीला आणि खाली रामेश्वरला होता?



मध्यंतरी हजारपंधराशे मैल का स्मशान होते? देव सर्वत्र आहे. त्याची सेवा करणे म्हणजे धर्म. सेवेची ती ती कर्मे पवित्र आहेत अशी श्रीकृष्णांची शिकवण.

## २३. भंगी म्हणजे समाजाची आई

भंगी का तुच्छ? समाजाला स्वच्छतेच्या स्वर्गात ठेवणारा तो बंधू. तो का हीन दीन? त्याची आपण काळजी घ्यावी. त्याची सुस्थिती ठेवावी. त्याला मान द्यावा. भंगी म्हणजे समाजाची आई. आई लहान मुलाची वेटळी काढते. दात येत असले म्हणजे मुलास वरचेवर शौचास होते. आई सारे करते. किती खस्ता ती खाते. परंतु आपण का तिच्यावर बहिष्कार घालतो? ''माते, सारखे भंगीकाम करीत आहेस. तू बाहेर जा.'' असे का म्हणतो? का तिची सेवा पाहून सहस्र प्रणाम करतो?

## २४. महात्माजी, सेनापती नि विनोबा

तुम्ही-आम्ही सेवाकर्मांना तुच्छ मानू लागलो की महापुरुष ती कामे हाती घेऊन ती पवित्र आहेत असे दाखवितात. सेवाग्रामला राहू लागल्यावर तेथील लोकांस महात्माजी म्हणाले, ''वाटेल तेथे शौचास नका बसत जाऊ'' परंतु कोण ऐकणार? शेवटी महात्माजी हातात पत्रा घेऊन झाडू घेऊन तेथे उभे राहात. ते म्हणाले, ''मी हुकूम करणारा नाही. सेवा करणारा आहे. 'चलेजाव'ची घोषणा करणारा महापुरुष हातात झाडू घेऊन उभा राहिला. तसेच सेनापती. बॉम्ब, पिस्तुल, तलवार हाती घेऊन ब्रिटिश सत्तेशी लढणारे सेनापती हातात झाडू घेऊन उभे राहतात. विनोबाजी रोज सकाळी एका गावात जाऊन भंगीकाम करतात. सेवामूर्ती आप्पासाहेब आज तेच करीत आहेत.त्यांनी मृत्य पशूही फाडून चामडे काढण्याचा धंदा पवित्र आहे, असे स्वत: करून दाखविले. मित्रांनो, ही सारी कर्मे पवित्र आहेत.

## २५. ऋषीचा प्रणाम

समाजाची सेवा करणाऱ्या सर्वांना ऋषी उचंबळून प्रणाम करीत आहे. रुद्रसूक्तात ऋषी म्हणतो, ''कुंभारा, तुला प्रणाम; सुतारा, तुला प्रणाम, चांभारा, तुला प्रणाम,'' मी लहानपणी हे मंत्र शिकलो. मोठेपणी अर्थ कळू लागला. मी सुट्टीत गावी जाऊन शंकराच्या देवळात बसत असे. मला वेद शिकविणारे भटजी